संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

रोखठोक बेधडक

संपादकीय.....

॥ न मे भक्त : प्रणश्यति ॥

# दाऊदच्या अटींची दमदाटी आणि सरकार

दाऊदच्या अटी मान्य करण्यासारख्या नव्हत्या म्हणून त्याच्या शरणागतीला नकार दिला गेला. हा माजी मुख्यमंत्री यांनी केलेला खुलासा एकूणच देशाच्या सुरक्षिततेचे आणि राजकारणातल्या बेपर्वाईचे प्रदर्शन करणारा आहे. ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ राम जेठमलानी यांच्यामार्फत दाऊद इब्राहिमने शरणागती पत्करण्याची तयारी दाखवली होती. परंतु त्याने अटी घातल्या. मला जेलमध्ये ठेवायचे नाही. मी माझ्या घरीच राहीन माझ्यावर कुठलाही खटला दाखल करायचा नाही अशा प्रकारच्या त्या अटी होत्या. वरवर पाहिले तर या अटी मान्य करण्यासारख्या ठरत नाहीत, परंतु एकूण भारतासाठी किंवा मुंबईसाठी कर्दनकाळ ठरलेल्या आणि ज्याला मोस्ट वॉण्टेड म्हणता येईल अशा गुन्हेगाराला आपल्या ताब्यात घेण्याची ही नामी संधी होती. यावेळी राजकीय मुत्सद्दीपणाची गरज होती. त्याने घातलेल्या अटी मान्य करून त्याला भारतात आणता आले असते. आणि तो इथे बसून अगदी सरळमार्गाने काही वागला नसता. त्याच्यावर अन्य पध्दतीने नवीन गुन्हे नोंदता आले असते. फक्त त्याला आपल्या ताब्यात कसे आणता येईल एवढेच राजकीय धारिष्ट्य आणि कौशल्य पणाला लावण्याची गरज होती. शरद पवारांनी ती जोखीम स्वीकारली नाही ही गोष्ट आज तीस वर्षांनी उघड झाली आहे. हे केवळ दाऊदबाबतीतच घडले असे नाही तर एकूणच भारताच्या सुरक्षिततेबाबत असेच पडखाऊ धोरण आतापर्यंत अवलंबले गेले. काँग्रेसच्या गेल्या चाळीस-पन्नास वर्षांच्या सत्तेच्या काळात देशाच्या सुरक्षिततेबाबत अनेक प्रकारच्या तडजोडी केल्या गेल्या. भारतीय जनता पार्टीचे सरकार सत्तेत असतानासुध्दा कंदहार विमान अपहरण प्रकरणातसुध्दा अशीच नांगी टाकली गेली. फक्त कारगिल प्रकरण नीट अंगावर आल्यामुळे भाजपाच्या काळात ते त्यांना परतवून लावावे लागले. पण तिथेसुध्दा सात-आठ दिवसांच्या युध्दकाळात चारशे जवानांचे बळी गेले. हे नुकसान कधीही भरून न येणारे ठरते. आजदेखील देशाच्या वेगवेगळ्या भागामध्ये नक्षलवादी नंगानाच घालतात. देशाच्या ईशान्य भागामध्ये बोडो, उल्फा यांच्यासारख्या दहशतवादी संघटना राजरोसपणे धुमाकूळ घालतात. अरुणाचल प्रदेशामध्ये चीनकडून सतत काही ना काही आगळीक सुरू राहते. काश्मीरमध्ये तर फुटीरतावाद्यांचासुध्दा आपण बंदोबस्त करू शकत नाही. इतकी नेभळट आणि पुळचट भूमिका आपले सत्ताधारी घेत असतात.

## एक चूक महागात पडली

इकडे मुंबईत अशी देशविरोधी एखाद दुसरे जरी विधान केले तरी त्याच्यावर ताबडतोब कारवाई होते. पण काश्मीरमधले फुटीरतावादी पाकिस्तानचे झेंडे फडकवतात. परंतु राजकारणातल्या गेंड्यांवर मात्र त्याचा काही परिणाम होत नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे सत्तेपुढे आपल्या देशातल्या राजकारण्यांना सुरक्षितता फारशी महत्त्वाची वाटली नाही. सतत मित्रत्वाचे सल्ले दिले गेले. आणि जोखीम पत्करण्याऐवजी शरणागतीचे धोरण अवलंबले गेले त्याचे फार गंभीर परिणाम भारताला भोगावे लागले आहेत. आजही देशाच्या चारही सीमावर्ती भागात ठोस सुरक्षा व्यवस्था नाही. पश्चिम किनारपट्टी किंवा पूर्वकिनारपट्टी हीसुध्दा शंभर टक्के सुरक्षित नाही. अलीकडे तर चीनने हिंदी महासागरामध्ये त्यांच्या लष्कराच्या कवायती सुरू केल्या आहेत आणि भारताचे लष्कर दुर्बिणी लावून त्या कवायती फक्त पाहत आहेत. अशा या भिकार आणि टुकार भूमिकांमुळे सामान्य माणसाचे जीवसुध्दा धोक्यात घातले गेले. यासंदर्भात जर त्या-त्या वेळी कठोर भूमिका घेतल्या गेल्या असत्या तर २६/११ सारखा मुंबईवरचा दहशतवादी हल्ला होऊ शकला नसता. दाऊदच्याबाबतीत त्याने अटी घातल्या म्हणून आम्ही त्याला भारतात येऊ दिले नाही हे म्हणणे इतके हास्यास्पद ठरते की, एखादा गुन्हेगार एखाद्या देशाच्या सरकारपुढे अटी ठेवतो आणि त्याचा योग्य तो फायदा ते सरकार उचलू शकत नाही ही दुर्दैवी गोष्टच म्हणावी लागेल. सत्तेपुढे शहाणपण चालत नाही त्याचा हा उत्तम नमुना ठरतो. यातला सर्वात महत्त्वाचा भाग असा की तीस वर्षेही बाब दडपली गेली. याबाबत त्यावेळच्या केंद्र सरकारने काय भूमिका घेतली हेसुध्दा पुढे आलेले नाही.शरद पवारांनी याबाबत स्वत:च निर्णय घेतला की, केंद्र सरकारशी सल्लामसलत केली होती याचाही उलगडा झालेला नाही.जर तसा विचारविमर्श केंद्र सरकारशी झाला असता आणि त्यातून दाऊदला पकडणे हे किती महत्त्वाचे आहे हे बिंबवले असते तर त्यातून अनेक मार्ग निघू शकले असते, परंतु आता आलेल्या माहितीवरून असे स्पष्ट दिसते की यासंदर्भात सुरक्षेशी संबंधित संस्थांशी पुरेशी चर्चा झाली नाही. आणि राजकीय मुत्सद्दीपणा आणि कौशल्य वापरण्यात त्यावेळचे राज्य आणि केंद्र सरकार पूर्णपणे अपयशी ठरले असे म्हणावे लागेल.निदान त्यावेळी दाऊदचा ठावठिकाणा तरी लागला होता.यासाठी परराष्ट्रीय धोरणांचा वापर करून त्याला भारतात कसे आणता येईल याचे तरी डावपेच आखता आले असते.तेही केले गेले नाही.त्याच्या अटी अमान्य त्यालाच जास्त महत्त्व दिले गेले.देशाची सुरक्षितता त्यामानाने कमी महत्त्वाची ठरली.सत्ता राबवताना फारशी जोखीम घ्यायची नाही.जे चालले आहे ते व्यवस्थित चालू द्यायचे नवे वाद निर्माण करायचे नाहीत, असा साधासोपा मार्ग स्वीकारला गेला.

## मुंबईवर वर्चस्व

आज तीस वर्षांनंतर या गोष्टीचा मागोवा घेतला तर दाऊदला न पकडल्यामुळे प्रामुख्याने मुंबईच्या सुरक्षिततेचे अनेक प्रश्न निर्माण झाले.आजही तो पाकिस्तानात बसून मुंबईतले खंडणीचे उद्योग सुरू ठेवतो.जर त्याला त्याचवेळी पकडले गेले असते किंवा शरणागतीच्या नावाखाली त्याला भारतात आणता आले असते तर निश्चितच मुंबईवरची काही संकटे रोखता आली असती. एक मुद्दा महत्त्वाचा ठरतो दाऊदने शरणागतीची ऑफर देऊन महाराष्ट्र सरकारचीच परीक्षा बघितली होती. खरे तर त्याला शरणागती म्हणताच येणार नाही. त्याच्या अटींना वेगळ्या पध्दतीने हाताळता आले असते. तर त्यात वैशिष्ट्य ठरले असते. त्या अटी नाकारून दाऊदच्या या दमदाटीपुढे सरकारनेच शरणागती पत्करली असेच त्याचे स्पष्ट चित्र निर्माण होते. दाऊद हा विषय भारताला किंवा महाराष्ट्र सरकारला किती दिवस पुरणार आहे हे माहीत नाही काही ना काही निमित्ताने तो चर्चेत येत असतो आणि कटकारस्थाने करून भारतावर दहशतही कायम ठेवत असतो. ते सगळे थांबवायचे असेल तर दाऊदला पकडणे हाच त्यावरचा जालीम उपाय ठरू शकतो.